# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**2 JULY, 2018**

[Time : 09-00]

**MARATHI SHORTHAND**

(80 Words Per Minute)

Marks : 100

**(Time allowed for Transcription of (A) and (B) passages : 1 Hr. and 40 Min.)**

**मराठी लघुलेखन**

[८० शब्द प्रति मिनिट]

गुण : १००

**[कालावधी – [अ] आणि [ब] उताऱ्यांचे लिप्यांतर करण्यासाठी १ तास व ४० मिनिटे]**

---

**[अ]** **[गुण : ४५ + ५ संकेताकृतींसाठी]**

मुलगी हे परक्याचे धन आहे, मुलगा हा वंशाचा दिवा आहे, म्हातारपणाचा आधार म्हणून मुलगाच हवा, / असे गैरसमज समाजात आजही मोठ्या प्रमाणावर आहेत. विशेषत: ग्रामीण भागात या विचारांचा मोठा // प्रभाव दिसून येतो. त्यामुळे मुलगाच हवा, असा अनेकांचा आग्रह असतो. साहजिक मुलगा होत नाही, तो पर्यंत प्रयत्न /// करत राहण्याकडे ओढा आढळतो, परंतु यात संबंधित स्त्रीची किती फरपट होते, तिचे कसे हाल होतात याचा //१// विचारच केला जात नाही तिही बिचारी सारे जाच निमूट सहन करत राहते. बाजीरावला पाच मुली असण्यामागे / हीच मानसिकता कारणीभूत असणार आहे. वास्तविक, आज मुली मोठ्या संख्येने उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत स्वत:चे // कर्तृत्व सिद्ध करत आहेत. विवाहानंतर आई-वडिलांचा व्यवस्थित सांभाळ करणाऱ्या मुलींचीही संख्या कमी नाही, परंतु हे /// दिलासादायक चित्र साऱ्यांसमोर येत नाही. साहजिक जुन्या विचारांचा पगडा कायम राहतो. आणखी एक बाब म्हणजे स्त्रीभ्रूण //२// हत्या, स्त्रियांवरील अत्याचार या संदर्भात कठोर कायदे करण्यात आले आहेत, परंतु त्याबाबतची माहिती तळागाळातील / जनतेपर्यंत पोहोचली का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. या महत्त्वाच्या गोष्टींबाबत अनभिज्ञ असणाऱ्यांची संख्या कमी नाही. // त्यामुळे अशांकडून स्त्री भ्रूण हत्या किंवा स्त्रियांवर अत्याचाराचे प्रयत्न होण्याची शक्यता वाढीस लागते. समाजाच्या /// सर्वांगीण बदलात शिक्षणाचा वाटा अतिशय महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे स्त्री भ्रूण हत्या किंवा मुलगा - मुलगी भेदाभेद //३// या संदर्भात शिक्षणाद्वारे व्यापक प्रमाणात जनजागरण केले जायला हवे. राष्ट्रीय सण वा उत्सवाच्या, विशेष दिनाच्या / निमित्ताने रॅली, पथनाट्ये याद्वारे सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात येतो, परंतु केवळ // अशा प्रयत्नांवर समाजात संपूर्णत: वा अपेक्षित परिवर्तन घडेल, असे म्हणता येत नाही. त्यासाठी अशा उपक्रमांमध्ये /// संघटनेचे योगदान मोलाचे ठरते, परंतु त्यांना या संदर्भात विशेष प्रशिक्षण दिले जाण्याचीही आवश्यकता आहे. //४//

**[दोन मिनिटांचे मध्यांतर]**

---

[ब] [गुण : ४५ + ५ संकेताकृतींसाठी]

अध्यक्ष महाराज, आज सर्वात अधिक महत्त्वाचा प्रश्न जर कोणता असेल तर तो म्हणजे आमच्या देशातील वाढती / लोकसंख्या कोणत्या प्रकारे नियंत्रित करावी हा होय. याच प्रश्नाच्या बरोबरीने महत्त्वाचा असणारा दुसरा कोणता प्रश्न // असेल तर तो म्हणजे आमच्या देशातील वाया जाणाऱ्या प्रचंड मनुष्यबळाचा उपयोग कोणत्या प्रकारे देशाचा विकास /// करण्यासाठी करुन घेता येईल हा होय. अध्यक्ष महाराज, विकसित अशा अनेक पाश्चिमात्य देशांसमोर त्यांनी आपल्या //१// देशाची लोकसंख्या नियंत्रित केल्यामुळे अपुऱ्या मनुष्यबळाचा प्रश्न उभा राहिला आहे आणि त्यांच्या देशातील / सार्वजनिक क्षेत्रात उपलब्ध असणारी विविध कष्टांची कामे करण्याकरिता त्यांना भारतासारख्या विकसनशील देशातून मनुष्यबळ // आयात करावे लागत आहे आणि त्याकरिता भरपूर पैसा खर्च करावा लागत आहे. अर्थात त्या देशांजवळ पैसा भरपूर असल्यामुळे /// आमचे मनुष्यबळ पैसा देऊन विकत घेणे त्यांना सहज शक्य होते परंतु आपल्या देशाची अवस्था //२// अशी आहे की देशामध्ये मनुष्यबळ अमाप आहे परंतु त्या बळाचे पोषण करून देशाचा विकास करण्यासाठी / त्या बळाचा वापर होईल अशा प्रकारे योजना तयार करणे या देशाला अद्याप शक्य झाले नाही कारण या देशात // अफाट गरीबीही आहे. पैसा कमी असल्यामुळे गंगा-कावेरी कालव्यासारख्या मनुष्यबळाचा पूर्णपणे उपयोग करवून घेऊ /// शकणाऱ्या योजना या देशाला राबविता येत नाहीत आणि परिणामतः देशाचा विकास खुंटलेला आहे व मनुष्यबळ वाया जात //३// आहे एका बाजूला लोकसंख्या नियंत्रित करून उत्पादन आणि खाणारी तोंडे यातील समन्वय साध्य करणे जसे आपल्याला / आवश्यक आहे त्याच प्रमाणे दुसऱ्या बाजूला असलेल्या खाणाऱ्या तोंडांना भरपूर अन्न उपलब्ध करवून त्यांच्या शक्तीचा // वापर देशाच्या विकासासाठी जास्तीत जास्त प्रमाणात करवून घेणेही आपल्याला आवश्यक आहे. तेव्हा अध्यक्ष /// महाराज, केंद्र सरकारने या सर्व कामांसाठी आपल्या सरकारला जेवढी जास्त मदत करणे शक्य होईल तेवढी करावी. //४//